# प्रकरण सहावे

# बेरड समुदायाचे धार्मिक, राजकीय जीवन आणि बदल

# प्रकरण सहावे
# बेरड समुदायाचे धार्मिक, राजकीय जीवन आणि बदल

## प्रस्तावना :

प्रस्तुत प्रकरणामध्ये बेरड समुदायातील धार्मिक, राजकीय जीवन आणि बदल झाल्याची माहितीचा आढावा घेतलेला आहे. या प्रकरणामध्ये दोन विभाग पाडलेले आहेत. पहिल्या विभागामध्ये बेरड समुदायाचे धार्मिक जीवन व बदल तर दुसऱ्या विभागात राजकीय जीवन व बदल असे विभाग पाडून बेरड समुदायातील पूर्वीची व सद्यपरिस्थितीतील धार्मिक, राजकीय जीवन आणि बदल झालेल्या स्थितीचा तुलनात्मक अभ्यास करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

## विभाग पहिला

## बेरड समुदायाचे धार्मिक जीवन व बदल

### सारणी क्र.६.१
### बेरड समुदायातील लोकांचे कुलदैवत दर्शविणारी माहिती


| अ.क्र. | कुलदैवत | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | महादेव | ५ | १०.० |
| २ | यल्लाम्मा | २३ | ४६.० |
| ३ | रेणूका | ६ | १२.० |
| ४ | मास्तेवा | ५ | १०.० |
| ५ | हनुमान | ५ | १०.० |
| ६ | व्हळेवा | ६ | १२.० |
| | **एकूण** | **५०** | **१००.०** |

वरील सारणी क्र.६.१ वरून असे स्पष्ट होते की बेरड समुदायातील बहुसंख्य (४६%) बेरड लोकांचे कुलदैवत हे यल्लाम्मा असून बाकीच्या बेरड लोकांचे (१२.0%) रेणूका, (१२.0%) व्हळेवा, (१०.0%) महादेव, (१२.0%) मास्तेवा, (१०.0%) हनुमान हे आहे. बेरड लोकांचे सदरचे कुलदैवत हे पूर्वी सुद्धा हेच होते व सद्यपरिस्थितीत सुद्धा हेच आहे.

म्हणजे बेरड लोकांच्या कुलदेवतेमध्ये कोणताच बदल दिसून येत नाही. वरील सारणी क्र.६.१ चे विश्लेषण आलेखाद्वारे अधिक स्पष्ट होईल.

**आलेक क्र.६.१**

**बेरड समुदायातील लोकांचे कुलदैवत दर्शविणारा आलेख**




**सारणी क्र. ६.२**

**बेरड समुदायातील लोकांच्या धार्मिक बाबी विषयीची पूर्वीची व सद्यपरिस्थितीची तुलनात्मक माहिती**

| अ.क्र. | परिवर्त्य | उत्तरांचे प्रवर्ग | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | तुम्ही धार्मिक विधी करत होता का? | होय | ५० | १०० % |
| २ | सद्यस्थितीत धार्मिक विधी करता का? | होय | ४३ | ८६.० % |
| | | नाही | ७ | १४.० % |
| | | **एकूण** | **५०** | **१०० %** |
| ३ | धार्मिक विधीचा हेतु काय? | मन:शांती | ३१ | ६२.० % |
| | | इच्छापूर्ती | १९ | ३८.० % |
| | | **एकूण** | **५०** | **१०० %** |
| ४ | पूर्वी तुम्ही धार्मिक विधीत बळी देत होता का? | होय | ४० | ८०.० % |
| | | नाही | १० | २०.० % |
| | | **एकूण** | **५०** | **१०० %** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५ | सद्यपरिस्थितीत देता काय? | होय | ३१ | ६२.0 % |
| | | नाही | १९ | ३८.0 % |
| | | **एकूण** | **५0** | **१00 %** |
| ६ | पूर्वी कोणकोणत्या प्राण्यांचा बळी देत होता? | बळी देत नाही | १0 | २0.0 % |
| | | कोंवडा | २४ | ४८.0 % |
| | | वकरी | १६ | ३२.0 % |
| | | **एकूण** | **५0** | **१00 %** |
| ७ | सद्यस्थितीत कोणकोणत्या प्राण्यांचा वळी देता? | बळी देत नाही | १९ | ३८.0 % |
| | | कोंवडा | १८ | ३६.0 % |
| | | वकरी | १३ | २६.0 % |
| | | **एकूण** | **५0** | **१00 %** |
| ८ | पूर्वी तुमच्या समुदायाचे समाज मंदिर होते का? | नाही | ५0 | १00 % |
| ९ | सद्यपरिस्थितीत आहे का? | नाही | ५0 | १00 % |
| १0 | पूर्वी जादू टोण्यावर, भूतप्रेत, आत्मा यावर विश्वास ठेवत होता काय? | होय | ५0 | १00 % |
| ११ | सद्यपरिस्थितीत ठेवता का? | होय | ७ | १४.0 % |
| | | नाही | ४३ | ८६.0 % |
| | | **एकूण** | **५0** | **१00 %** |
| १२ | पूर्वी धर्मामध्ये स्त्रियांची भूमिका कशी होती? | निच्च | ५0 | १00.0 % |
| १३ | सद्यपरिस्थितीत स्त्रियांची भूमिका कशी आहे? | उच्च | २१ | ४२.0 % |
| | | समान | २९ | ५८.0 % |
| | | **एकूण** | **५0** | **१00 %** |
| १४ | मुलांना धार्मिक वार्वीविषयीची माहिती द्यावीसी वाटते का? | होय | ३५ | ७0.0 % |
| | | नाही | १५ | ३0.0 % |
| | | **एकूण** | **५0** | **१00 %** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १५ | असल्यास का? | देत नाहीत | १५ | ३0.0 % |
| | | धर्माबद्दल पूर्ण माहिती असावी म्हणून | १५ | ३0.0 % |
| | | पारंपरिक पद्धतीचे पालन | ११ | २२.0 % |
| | | धर्माबद्दल आस्था म्हणून | ९ | १८.0 % |
| | | **एकूण** | **५0** | **१00 %** |
| १६ | नसल्यास का? | देतात | ३५ | ७0.0 % |
| | | पारंपरिक पद्धतीचे खंडन करण्यासाठी | 0९ | १८.0 % |
| | | अंधश्रद्धा दूर करण्यासाठी | 0६ | १२.0 % |
| | | **एकूण** | **५0** | **१00 %** |
| १७ | पूर्वी तुमच्या समुदायात वेगवेगळ्या गितांचा कार्य क्रम होत होता का ? | होय | २९ | ५८.0 % |
| | | नाही | २१ | ४२.0% |
| | | **एकूण** | **५0** | **१00 %** |
| १८ | सद्यपरिस्थितीत होतात का? | नाही | ५0 | १00 % |
| १९ | पूर्वी तुम्ही नाटक सिनेमा वारंवार पाहत होता का? | होय | ५0 | १00 % |
| २0 | सद्यपरिस्थितीत पाहता का? | नाही | ५0 | १00 % |
| २१ | पूर्वी तुम्हाला कामातून वेळ मिळत होता का? | होय | २२ | ४४.0 % |
| | | नाही | २८ | ५६.0 % |
| | | **एकूण** | **५0** | **१00 %** |
| २२ | सद्यपरिस्थितीत मिळतो का? | होय | ३ | 0६.0 % |
| | | नाही | ४७ | ९४.0 % |
| | | **एकूण** | **५0** | **१00 %** |

वरील सारणी क्र.६.२ मध्ये मुलाखत अनुसूचीद्वारे वेरड समुदायातील उत्तरदात्यांकडून त्यांच्या धर्माची पूर्वीची व सद्यस्थितीची धार्मिक वावी विषयीची तुलनात्मक माहिती दिलेली आहे तिचे विश्लेषण खालीलप्रमाणे :

## धार्मिक विधी करण्याचे प्रमाण:

वेरड समुदायातील सर्वच (१००%) लोक पूर्वी धार्मिक विधी करत होते. सद्यपरिस्थितीतही वहुसंख्य (८६%) बेरड लोक धार्मिक विधी करतात. पण उर्वरीत सर्वात कमी (१४%) बेरड लोक मात्र धार्मिक विधी करत नाहीत.

## धार्मिक विधीचा हेतू :

बेरड समुदायातील उत्तरदात्यांना धार्मिक विधीचा हेतू काय ? असा प्रश्न विचारला असता उत्तरदात्यांकडून उत्तरादाखल अशी माहिती मिळाली की वहुसंख्य (६२%) बेरड लोक मन:शांती मिळविण्यासाठी धार्मिक विधी करतात तर उर्वरित (३८%) वेरड लोक मनातील इच्छापूर्ती होण्यासाठी धार्मिक विधी करतात.

## धार्मिक विधीत बळी देण्याचे प्रमाण :

पूर्वी वेरड समुदायातील वहुसंख्य (८०%) वेरड लोक धार्मिक विधीत प्राण्यांचे बळी देत होते. उर्वरीत (२०%) वेरड लोक मात्र धार्मिक विधीत प्राण्यांचे वळी देत नव्हते. सद्यपरिस्थितीत ही वेरड लोक धार्मिक विधीत प्राण्यांचा वळी देताना दिसतात. परंतु पूर्वीच्या प्रमाणात व सद्याच्या प्रमाणात थोडासा बदल झाल्याचे दिसते. सद्यस्थितीत बहुसंख्य (६२%) बेरड लोक धार्मिक विधीत प्राण्यांचा बळी देतात तर उर्वरीत (३८%) वेरड लोक मात्र देताना दिसत नाहीत.

पूर्वी वेरड समुदायातील वहुसंख्य (४८%) वेरड लोक हे धार्मिक विधीत कोंवडा या प्राण्याचा वळी देत होते तर उर्वरीत (३२%) वेरड लोक धार्मिक विधीत वोकड या प्राण्याचा बळी देत होते. सद्यपरिस्थितीत ही बहुसंख्य (३६%) वेरड लोक कोंवडा तर उर्वरीत (२६%) वेरड लोक बोकड या प्राण्याचा धार्मिक विधीत वळी देतात.

## बेरड समुदायाचे समाज मंदीर :

माणगाव येथील वेरड समुदायातील बेरड लोकांचे पूर्वीपासून ते आजतागायतपर्यंत समाज मंदीर नसल्याचे दिसते. इतर अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीचे जसे समाज मंदीर आहे तसे समाज मंदीर माणगांव गावातील वेरड लोकांचे नाही.

## जादू-टोण्यावर, भूतप्रेत, आत्मा यावर विश्वास :

पूर्वी बेरड समुदायातील वहुसंख्य बेरड लोक जादू टोण्यावर, भूतप्रेत, आत्मा यावर विश्वास ठेवत होते. मुलाखत अनुसूचीच्याद्वारे वेरड समुदायातील उत्तरदात्यांना सद्यपरिस्थितीत तुम्ही जादू टोण्यावर, भूतप्रेत आत्मा यावर विश्वास ठेवता का ? असा प्रश्न विचारला असता उत्तरदात्यांच्याकडून उत्तरादाखल अशी माहिती मिळाली की, सद्यपरिस्थितीत वहुसंख्य (८६%) वेरड लोक हे जादू टोण्यावर, भूतप्रेत, आत्मा यावर विश्वास ठेवत नाहीत. तर उर्वरीत सर्वात कमी (१४%) वेरड लोक जादू टोण्यावर, भूतप्रेत, आत्मा यावर विश्वास ठेवतात.

## धर्मामध्ये स्त्रियांची भूमिका :

पूर्वीच्या वेरड समुदायातील स्त्रियांच्या भूमिकेच्या संदर्भात विचार केला असता असे दिसून येते की पूर्वी धर्मामध्ये स्त्रियांची भूमिका ही अत्यंत निच्च किंवा निम्न असलेली दिसते. सद्यपरिस्थितीत मात्र वेरड समुदायातील स्त्रियांची धर्मातील भूमिका किंवा धर्मातील स्थान बदललेले दिसते. तिचा सामाजिक, धार्मिक दर्जा सुधारलेला, उंचावलेला दिसतो. सद्यपरिस्थितीत बहुसंख्य (५८%) वेरड स्त्रियांची धर्मातील भूमिका समान स्वरूपात म्हणजे पुरूषांबरोबरची असलेली दिसते. तर उर्वरीत (४२%) वेरड स्त्रियांची भूमिका ही उच्च असलेली दिसते.

## मुलांना धार्मिक बाबीविषयीची माहिती :

मुलांना धार्मिक वावी विषयीची माहिती द्यावीसी वाटते का? असा प्रश्न वेरड समुदायातील उत्तरदात्यांना विचारला असता उत्तरदात्यांकडून मिळालेल्या उत्तरादाखल अशी माहिती मिळाली की, वहुसंख्य (७0%) वेरड लोकांना मुलांना धार्मिक वावींविषयीची माहिती द्यावीसी वाटते. परंतु उर्वरीत (३0%) लोकांना मात्र मुलांना धार्मिक वावीविषयीची माहिती

द्यावीसी वाटत नाही.

ज्या बेरड व्यक्तींना आपल्या मुलांना धार्मिक बावी विषयीची माहिती द्यावीसी वाटते त्या बेरड व्यक्तींना त्या पाठीमागची कारणे विचारली असता असे दिसून येते की, बहुसंख्य (३0%) बेरड लोकांना असे वाटते की आपल्या मुलांना आपल्या धर्माबद्दल पूर्व माहिती असावी तर काही (२२%) बेरड लोकांना असे वाटते की पारंपरिक पद्धतीचे पालन केले पाहिजे तर उर्वरीत (१८%) बेरड लोकांना आपल्या धर्माबद्दल आस्था राखावी म्हणून त्यांना आपल्या मुलांना धार्मिक बावीविषयीची माहिती द्यावीसी वाटते.

ज्या बेरड व्यक्तींना आपल्या मुलांना धार्मिक बावींविषयीची माहिती द्यावीसी वाटत नाही. त्या बेरड व्यक्तींना त्या पाठीमागची कारणे विचारली असता असे दिसून येते की बहुसंख्य (१८%) बेरड लोकांना असे वाटते की जी पारंपरिक पद्धत चालत आली आहे त्या पारंपरिक पद्धतीचे खंडण करावे, तर उर्वरीत (१२%) लोकांना असे वाटते की आपल्या समाजामध्ये पसरलेली धर्माबद्दलची जी अंधश्रद्धा आहे ती दूर व्हावी म्हणून त्यांना आपल्या मुलांना धार्मिक बावी विषयीची माहिती द्याविसी वाटत नाही.

## बेरड समुदायामधील वेगवेगळ्या लोकगितांचा कार्यक्रम :

बेरड समुदायातील उत्तरदात्यांना पूर्वी तुमच्या समुदायात वेगवेगळ्या लोकगितांचा कार्यक्रम होत होता का? असा प्रश्न विचारला असता उत्तरदात्यांनी दिलेल्या उत्तरादाखल माहितीवरून असे स्पष्ट होते की बहुसंख्य (५८%) बेरड समुदायातील उत्तरदात्यांच्या मते पूर्वी वेगवेगळ्या लोकगितांचे कार्यक्रम होत होते तर उर्वरीत (४२%) बेरड समुदायातील उत्तरदात्यांच्या मते पूर्वी लोकगितांचे कार्यक्रम होत नव्हते. सद्यपरिस्थितीत होतात का ? असा प्रश्न विचारला तेव्हा उत्तरदात्यांनी दिलेल्या माहितीवरून असे दिसून येते की सद्यपरिस्थितीत बेरड समुदायात वेगवेगळ्या लोकगितांचे कार्यक्रम होत नाहीत.

## नाटक किंवा सिनेमा :

पूर्वी बेरड समुदायातील लोक नाटक किंवा सिनेमा वारंवार पाहत होते. परंतु सद्यस्थितीत मात्र बेरड समुदायातील लोक नाटक किंवा सिनेमा वारंवार पाहत नाहीत.

... LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

## रिकामा वेळ :

बहुसंख्य (५६%) बेरड लोकांना पूर्वी कामातून वेळ मिळत नव्हता तर उर्वरीत (४४%) बेरड लोकांना कामातून बेळ मिळत होता. सद्यपरिस्थितीचा विचार केला असता असे दिसून येते की, सद्यपरिस्थितीत बहुसंख्य (९४%) बेरड लोकांना कामातून वेळ मिळत नाही तर उर्व रीत सर्वात कमी (६%) बेरड लोकांना कामातून वेळ मिळतो.

## विभाग दुसरा

## बेरड समुदायाचे राजकीय जीवन व बदल

पूर्वी बेरड समुदायातील लोकांचा राजकीय सहभाग पाहता अत्यंत नगण्य असलेला दिसून येतो. पूर्वीच्या परिस्थितीत बेरड समुदायासाठी ग्रामपंचायतीने केलेली कामे असतील किंवा सरकारी योजना राबविलेल्याचे प्रमाण असेल तसेच बेरड लोकांचे ग्रामीण जीवनमान सुधारण्यासाठी सरकारने केलेल्या उपाययोजना असतील आणि त्याचप्रमाणे बेरड समुदायातील लोकांचा राजकीय सहभाग किंवा राजकारणाबाबतची जाणीव असेल या सर्व बाबींचा सद्यपरिस्थितीशी तुलना केली असता खूपच तफावत दिसून येते. तेव्हा बेरड समुदायातील लोकांची पूर्वीची व सद्यपरिस्थितीतील राजकीय स्थितीविषयीची विस्तृतपणे माहिती सारण्या व विशिष्ट ठिकाणी आलेख काढून पुढीलप्रमाणे स्पष्ट केली आहे.

**सारणी क्र.६.३**

**बेरड समुदायातील उत्तरदात्यांची राजकीय स्थिती दर्शविणारी माहिती**

| अ.क्र. | परिवर्त्य | उत्तरांचे प्रवर्ग | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | पूर्वी तुमच्या समाजातील लोक गावच्या ग्रामपंचायतीमध्ये होते काय? | होय | २० | ४०.० % |
| | | नाही | ३० | ६०.० % |
| | | **एकूण** | **५०** | **१०० %** |
| २ | सद्यपरिस्थितीत आहेत का? | होय | ५० | १०० % |
| ३ | पूर्वी तुमच्या समुदायातील स्त्री- ग्रामपंचायतीमध्ये सदस्य होती का? | नाही | ५० | १०० % |
| ४ | सद्यपरिस्थितीत आहे का? | होय | ५० | १०० % |
| ५ | ग्रामपंचायतीने तुमच्यासाठी | आवश्यक असलेली | ५० | १०० % |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | कोणती कामे केलेली आहेत? | सर्व कामे | | |
| ६ | पूर्वी सरकारी योजना राबविलेल्या होत्या का? | होय | २२ | ४४.0 % |
| | | नाही | २८ | ५६.0 % |
| | | **एकूण** | **५0** | **१00.0 %** |
| ७ | सद्यपरिस्थितीत राबविलेल्या आहेत का? | होय | ३0 | ६0.0 % |
| | | नाही | २0 | ४0.0 % |
| | | **एकूण** | **५0** | १00.0 % |
| ८ | सद्यपरिस्थितीत कोणत्या योजना राबविल्या आहेत? | इंदिरा गांधी निवास योजना | २८ | ५६.0 % |
| | | घरकूल योजना | २२ | ४४.0 % |
| | | **एकूण** | **५0** | १00.0 % |
| ९ | तुम्हाला राजकारणामध्ये आवड होती का? | होय | १0 | २0.0 % |
| | | नाही | ४0 | ८0.0 % |
| | | **एकूण** | ५0 | १00.0 % |
| १0 | सद्यपरिस्थितीत आवड आहे का? | होय | ५0 | १00.0 % |
| ११ | पूर्वी राजकारणात स्त्रीयांचा प्रवेश कसा मानला जायचा? | अयोग्य | ५0 | १00.0 % |
| १२ | अयोग्य असल्यास का? | शारिरीक लैगिंक भेदामुळे | २0 | ४0.0 % |
| | | स्त्रीकडे समाजाचा पाहण्याचा दृष्टीकोन | ३0 | ६0.0 % |
| | | **एकूण** | **५0** | **१00.0 %** |
| १५ | सद्यपरिस्थितीत कसा आहे? | योग्य | ५0 | १00.0 % |
| १६ | तुम्हाला कुळ कायद्याचा फायदा झाला का? | होय | १४ | २८.0 % |
| | | नाही | ३६ | ७२.0 % |
| | | **एकूण** | **५0** | **१00.0 %** |
| १७ | नसल्यास का? | कायद्याची अंमलबजावणी न केल्यामुळे | २0 | ४0.0 % |
| | | जमिन न घेतल्यामुळे | १६ | ३२.0 % |
| | | **एकूण** | **३६** | **७२.0 %** |

वरील सारणी क्र.६.३ मध्ये मुलाखत अनुसूचीद्वारे बेरड समुदायातील उत्तरदात्यांकडून त्यांच्याच समुदायातील लोकांची पूर्वीची व सद्यपरिस्थितीची राजकीय स्थितीची गोळा केलेली तुलनात्मक माहिती दिलेली आहे तिचे विश्लेषण खालीलप्रमाणे :

**बेरड समुदायातील लोकांचे गावच्या ग्रामपंचायतीमधील स्थान :**

बेरड समुदायातील बहुसंख्य (६०.0%)उत्तरदात्यांच्या मते बेरड लोक गावच्या ग्रामपंचायतीमध्ये ग्रामपंचायत सदस्य म्हणून नव्हते. तर उर्वरीत (४०.0%) उत्तरदात्यांच्या मते, बेरड लोक ग्रामपंचायतीमध्ये ग्रामपंचायत सदस्य म्हणून होते. सद्यपरिस्थितीत मात्र वेरड समुदायातील सर्वच (१00%) उत्तरदात्यांच्या मते बेरड समुदायातील लोक गावच्या ग्रामपंचायतीमध्ये कोणत्यांना कोणत्यातरी पदावर काम करीत आहेत.

**बेरड समुदायातील स्त्रीयांचे ग्रामपंचायतीमधील स्थान:**

पूर्वी बेरड समुदायातील स्त्रिया ग्रामपंचायतीमध्ये ग्रामपंचायत सदस्य नव्हत्या परंतु सद्यपरिस्थितीमध्ये मात्र वेरड समुदायातील स्त्रिया गावच्या ग्रामपंचायतीमध्ये ग्रामपंचायत सदस्य म्हणून कार्यरत आहेत.

**ग्रामपंचायतीने बेरड समुदायासाठी केलेली कामे :**

वेरड समुदायासाठी गावच्या ग्रामपंचायतीने वेगवेगळ्या प्रकारची कामे केलेली दिसून येतात. बेरड समुदायामध्ये सर्वेक्षण केल्यानंतर असे दिसून आले की, वेरड समुदायासाठी गावच्या ग्रामपंचायतीने पाण्याची सोय, दिवाबत्तीची सोय, गटारांची रस्त्यांची सोय व इतर सोयी केलेल्या आहेत.

**सरकारी योजना:**

वेरड समुदायातील उत्तरदात्यांना पूर्वी तुमच्यासाठी सरकारी योजना राबविल्या होत्या का? असा प्रश्न विचारला असता उत्तरदात्यांनी दिलेल्या उत्तरादाखल अशी माहिती मिळाली की बहुसंख्य (५६.0%) उत्तरदात्यांच्या मते पूर्वी सरकारी योजना राबविल्या गेल्या नव्हत्या. तर उर्वरीत (५४.0%) वेरड उत्तरदात्यांच्या मते पूर्वी सरकारी योजना राबविल्या गेल्या होत्या.

सद्यपरिस्थितीबाबतचा विचार केल्यास बेरड समुदायातील बहुसंख्य (६०.०%) उत्तरदात्यांच्या मते सद्यपरिस्थितीत बेरड समुदायासाठी सरकारी योजना राबविलेल्या आहेत. तर उर्वरीत (४०.०%) बेरड उत्तरदात्यांच्या मते सरकारी योजना राबविल्या गेल्या नाहीत.

बेरड समुदायासाठी सरकारी योजना पूर्वी व सद्यपरिस्थिती न राबविण्याची कारणे विचारली असता पुढील कारणे आढळून आली. पहिले कारण म्हणजे भ्रष्टाचारी प्रशासन व्यवस्था आणि दुसरे कारण म्हणजे लोकांच्या मते योजना जाहिर झाल्या नव्हत्या.

बेरड समुदायामध्ये ज्या योजना सद्यपरिस्थितीत राबविल्या गेलेल्या आहेत. त्यामध्ये बहुतांशी (५६.०%) इंदिरा गांधी निवास योजना तर उर्वरीत (५४.०%) घरकूल योजना राबविल्या गेलेल्या आहेत.

## बेरड लोकांची राजकारणामधील आवड :

बेरड समुदायातील लोकांना पूर्वी तुम्हाला राजकारणामध्ये आवड होती का ? असा प्रश्न विचारला असता उत्तरदात्यांनी दिलेल्या उत्तरादाखल माहितीवरून असे आढळून येते की, बेरड समुदायातील बहुसंख्य (८०.०%) लोकांना पूर्वी राजकारणामध्ये आवड नव्हती तर उर्वरीत (२०.०) बेरड लोकांना मात्र राजकारणामध्ये आवड होती.

सद्यपरिस्थितीबाबत विचार केल्यास बेरड समुदायामधील सर्वच (१००.०%) बेरड लोकांना सद्यपरिस्थितीत राजकारणामध्ये आवड असलेली दिसून येते.

## राजकारणामधील स्त्रियांचा प्रवेश :

पूर्वी बेरड समुदायातील स्त्रियांचा राजकारणातील प्रवेश अयोग्य मानला जायचा. किंबहुना त्यांना प्रवेशच दिला जात नसे. बेरड समुदायातील स्त्रीयांचा राजकारणातील प्रवेश अयोग्य असल्याची कारणे विचारली असता पुढील कारणे आढळून आली. पहिले कारण म्हणजे बहुसंख्य (६०.०%) लोकांच्यामते स्त्रीकडे समाजाचा पाहण्याचा दृष्टिकोन आणि दुसरे कारण म्हणजे उर्वरीत (४०.०%) बेरड उत्तरदात्यांच्या मते शारिरिक लैंगिक भेदामुळे पूर्वी बेरड समुदायातील स्त्रियांचा प्रवेश राजकारणामध्ये अयोग्य मानला जायचा. सद्यपरिस्थितीत

मात्र वेरड समुदायातील स्त्रियांचा प्रवेश राजकारणामध्ये योग्य मानला जातो तसे त्यांना स्वातंत्र्य आहे.

## कुळ कायद्याचा फायदा :

तुम्हाला कुळ कायद्याचा फायदा झाला का? असा प्रश्न वेरड समुदायातील लोकांना विचारला असता मिळालेल्या उत्तरावरून असे दिसून येते की, वहुतांशी (७२.0%) वेरड लोकांना कुळ कायद्याचा फायदा झाला नाही तर उर्वरित (२८.0%) वेरड लोकांना कुळ कायद्याचा फायदा झाला आहे. ज्या वेरड लोकांना कुळ कायद्याचा फायदा झाला नाही. त्या वेरड लोकांना कुळ कायद्याचा फायदा का झाला नाही? असा प्रश्न विचारला तेव्हा पुढील कारणे प्रामुख्याने निदर्शनास आली. पाहिले कारण म्हणजे वहुसंख्य (४0.0%) वेरड लोकांच्या मते कायद्याची अमंलवजावणी झालीच नाही आणि दुसरे कारण म्हणजे उर्वरीत (३२.0%) वेरड लोकांच्या मते कोणत्याही प्रकारची जमीन न घेतल्यामुळे कुळ कायद्याचा फायदा झाला नाही.

### सारणी क्र. ६.४
### बेरड समुदायातील लोकांची राजकीय नेत्याबद्दलची असलेली मते दर्शविणारी माहिती


| अ.क्र. | राजकीय नेत्याबद्दलचे मत | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | सर्व नेते भ्रष्टाचारी आहेत. | १५ | ३0.0 % |
| २ | सर्व नेते कोणत्याही कामाचे नाहीत. | १२ | २४.0 % |
| ३ | ठराविक नेते चांगले आहेत. | २३ | ४६.0 % |
| | **एकूण** | **५0** | **१00.0 %** |

वरील सारणी क्र.६.४ मध्ये मुलाखत अनुसूचीद्वारे वेरड समुदायातील लोकांची राजकीय नेत्यांबद्दल असलेल्या मताविषयीची गोळा केलेली माहिती दिलेली आहे. या सारणीतील आकडेवारीवरून असे दिसून येते की बेरड समुदायातील वहुसंख्य (४६.0%) बेरड लोकांच्या मते ठराविक नेते चांगले आहेत, काही (३0.0%) वेरड लोकांच्या मते, सर्व नेते भ्रष्टाचारी आहेत. तर उर्वरीत (२४.0%) बेरड लोकांच्या मते, सर्व नेते कोणत्याही कामाचे नाहीत. या वरील आकडेवारीवरून असे दिसून येते की, वेरड समुदायातील लोकांमध्ये

राजकीय नेत्यांबद्दलची मते नकारार्थी आहेत. वरील सारणी क्र.६.४ मधील आकडेवारीचे विश्लेषण आलेखाद्वारे अधिक स्पष्ट होईल.

### आलेख क्र. ६.२

### बेरड समुदायातील लोकांची राजकीय नेत्याबद्दलची असलेली मते दर्शविणारा आलेख




### सारणी क्रमांक ६.५

### बेरड समुदायातील लोकांच्या मते, ग्रामीण जीवन सुधारण्यासाठी सरकारने अजून करावयाची कामे दर्शविणारी माहिती

| अ.क्र. | सरकारने करावयाची कामे | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | रोजगार उपलब्ध करून देणे. | २२ | ४४.० % |
| २ | अत्याधुनिक तंत्रविद्या, बि-बियाणे, अवजारे यांचा पुरवठा करणे. | ११ | २२.० % |
| ३ | शिक्षणाच्या सोई व सवलती मध्ये वाढ करणे. | ११ | २२.० % |
| ४ | दळणवळणाच्या सोईमध्ये वाढ करणे. | ६ | १२.० % |
| | **एकूण** | **५०** | **१००.० %** |

वरील सारणी क्र.६.५ मध्ये मुलाखत अनुसूचीद्वारे घेण्यात आलेल्या मुलाखतीवरून बेरड समुदायातील लोकांच्या मते, ग्रामीण जीवन सुधारण्यासाठी सरकारने अजून काय करावे?

याविषयीची मते नोंदवलेली आहेत. या नोंदवलेल्या मतांच्या माहितीवरून असे दिसून येते की, बहुसंख्य (४४.0%) बेरड लोकांच्या मते ग्रामीण जीवन सुधारण्यासाठी सरकारने जास्तीत जास्त लोकांना जास्तीत जास्त रोजगार उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. काही (२२.0%) बेरड लोकांच्या मते सरकारने अत्याधुनिक तंत्रविद्या, बि-बियाणे, अवजारे यांचा पुरवठा करणे, तर बाकीच्या (२२.0%) बेरड लोकांच्या मते, सरकारने शिक्षणाच्या सोई व सवलती मध्ये वाढ करणे तर उर्वरीत सर्वात कमी (१२.0%) बेरड लोकांच्या मते, दळवळणाच्या साईमध्ये वाढ करणे ग्रामीण जीवन सुधारण्यासाठी अत्यावश्यक आहे.

वरील सारणी क्र. ६.५ मध्ये दिलेल्या माहितीचे विश्लेषण आलेखाद्वारे दिल्यास अधिक स्पष्ट होईल. सदर माहितीचे विश्लेषण आलेखाद्वारे पुढीलप्रमाणे स्पष्ट केलेले आहे.

**आलेख क्रमांक ६.३**

**बेरड समुदायातील लोकांच्या मते, ग्रामीण जीवन सुधारण्यासाठी सरकारने अजून करावयाची कामे दर्शविणारा आलेख**

